

दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे



वर्ष ६ ▮ अंक ४० ▮ सोमवार २ नोव्हेंबर २०२६ ▮ पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainikaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

जिल्हा न्यायालय बॉम्बने उडवण्याची धमकी

सुरक्षा यंत्रणांची धावपळ, परिसर रिकामा करत कसून तपासणी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहिल्यानगर जिल्हा व सत्र न्यायालय बॉम्बने उडवून देण्याची धमकी सोमवारी ईमेलद्वारे आल्याने मोठी खळबळ उडाली. या गंभीर धमकीनंतर प्रशासनाने तात्काळ पावले उचलत संपूर्ण न्यायालय परिसर रिकामा केला. सुरक्षेचा उपाय म्हणून सर्व न्यायिक अधिकारी, वकील आणि पक्षकारांना सुरक्षितपणे न्यायालयाबाहेर काढण्यात आले. हा कोणाचा तरी खोडसाळपणा असल्याचा संशय व्यक्त होत आहे. आज आठवड्याचा पहिला दिवस असल्याने न्यायालय परिसरात मोठी वर्दळ होती. अचानक आलेल्या धमकीच्या ई-मेल मुळे सर्वांचेच धावपळ उडाली.

घटनेची माहिती मिळताच पोलीस प्रशासन तात्काळ सतर्क झाले आणि न्यायालय परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्वतः न्यायालयाला भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. श्वानपथक तसेच बॉम्ब शोधक व नाशक पथकाकडून जिल्हा व सत्र न्यायालयाच्या इमारतीची कसून तपासणी करण्यात आली. कोतवाली, तोफखाना व भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी, कर्मचारी असा मोठा फौजफाटा या ठिकाणी तळ ठोकून होता. या गंभीर धमकीच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण न्यायालय परिसर रिकामा करून तपासणी करण्यात आली. सुदैवाने संशयास्पद काहीही आढळून आले नाही. न्यायालय परिसर रिकामा केल्याने वाहने व वकील, पक्षकारांच्या गर्दीमुळे न्यायालयाच्या शेजारील पुणे-संभाजीनगर रस्त्यावरील डीएसपी चौकात काही वेळ प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. या धमकीमुळे आज न्यायालयीन कामकाजावर मोठा परिणाम झाल्याचे दिसून आले.

राज्यभरात धमक्या आल्याने खळबळ

ही घटना केवळ अहिल्यानगरपुरती मर्यादित नसून, पुण्याच्या शिवाजीनगरसह बीड, ठाणे, सांगली, परभणी, रत्नागिरी, हिंगोली, सोलापूर आणि सातारा अशा राज्यातील डझनहून अधिक जिल्हा व सत्र न्यायालयांना एकाच वेळी ईमेलद्वारे अशा धमक्या आल्या. प्राथमिक तपासात हा एखाद्याचा खोडसाळपणा असल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. सध्या पोलीस आणि सायबर सेल या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत.

कारने येऊन घरफोड्या करणारी जालना जिल्ह्यातील टोळी गजाआड

एलसीबीच्या कारवाईत साडेसतरा लाखांचा मुद्देमाल जप्त

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– टाकळी ढोकेश्वर (ता. पारनेर) येथे दिवसाढवळ्या घरफोडी करणाऱ्या जालना जिल्ह्यातील एका सराईत टोळीला अहिल्यानगर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने जेरबंद केले आहे. या टोळीकडून गुन्ह्यात वापरलेली डस्टर कार, दुचाकी आणि सोन्याच्या दागिन्यांसह एकूण १७ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दिनांक २५ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी दीड वाजेच्या सुमारास टाकळी ढोकेश्वर येथील खिलारी वस्तीवर राहणाऱ्या मंगल संतोष गोरडे यांच्या घराचे कुलूप तोडून अज्ञात तीन चोरट्यांनी ▮ पान ४ वर

पथकात यांचा सहभाग

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे तसेच तपास पथकातील पोलीस उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड, अनंत सालगुडे आणि पोलीस अंमलदार अतुल लोटके, निळकंठ कारखेले, फुरकान शेख, अभिजीत अरकल, भिमराज खर्से, सागर ससाणे, अमोल कोतकर, अमोल आजबे, प्रकाश मांडगे, भगवान सानप, बाळासाहेब खेडकर, प्रशांत राठोड, किरण ठुबे, अरूण मोरे व भगवान धुळे यांनी केली.

नेवाशातील भुसार मालाचे दुकान फोडणारी आंतरजिल्हा टोळी जेरबंद



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– नेवासा तालुक्यातील हंडीनिमगाव येथील भुसार मालाचे दुकान फोडून एक लाख पंचाहत्तर हजार रुपये किमतीचे सोयाबीन चोरून नेणाऱ्या आंतरजिल्हा टोळीच्या मुसक्या स्थानिक गुन्हे शाखेने आवळल्या आहेत. या कारवाईत बुलढाणा व जालना जिल्ह्यातील तीन आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून १ लाख २८ हजार ७८० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

दिनांक ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी हंडीनिमगाव (ता. नेवासा) येथील शिनाई ई-ट्रेडिंग या भुसार मालाच्या दुकानाचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी पावणेदोन लाख रुपये किमतीचे सोयाबीन चोरले होते. याप्रकरणी प्रदीप कडुबाळ भनगे यांच्या फिर्यादीवरून नेवासा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी गुन्हे उघडकीस आणण्याचे आदेश दिल्यानंतर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या पथकाने समांतर तपास सुरू केला.

तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या ▮ पान ४ वर

समाजासाठीची आपली धडपड
कायम स्मरणात



स्व. भानुदास एकनाथ कोतकर
स्व. शनिवार, दि. २४/१०/२०२६
आपल्या पावन स्मृतीस
विनम्र अभिवादन!



* शोकाकुल *
श्री. भाऊसाहेब नानासाहेब बोठे
(सभापती)

श्री. रभाजी मुक्ताजी सुळ
(उपसभापती)

श्री. अभय भिसे
(सचिव)

सौ. सुप्रियाताई अमोल कोतकर
कु. आचल रामदास सोनवणे
श्री. संतोष रामदास म्हस्के
श्री. सुधीर विश्वासराव भापकर
श्री. भाऊ महादू भोर
श्री. राजू पांडुरंग आंबेकर
श्री. धर्मनाथ आनंदा आव्हाड
श्री. राजेंद्र झुंबरलाल बोथरा

सौ. मनीषा मंजाबापू घोरपडे
श्री. हरिभाऊ लक्ष्मण कर्डिले
श्री. संजय श्रीधर गिरवले
श्री. दत्तात्रय लहाणू तापकीरे
श्री. मधुकर किसन मगर
श्री. सुभाष भाऊ निमसे
श्री. भाऊसाहेब दादाबा ढोबे
श्री. निलेश अशोक सातपुते

कृषी उत्पन्न बाजार समिती, अहिल्यानगर

'ग्रीन सिटी' मोहिमेत १५ हजार वृक्षलागवड व संवर्धनाचे उद्दिष्ट पूर्ण!

साई द्वारका सेवा ट्रस्ट व महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने वृक्षवाटप



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर–पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतील ग्रीन सिटी मोहिमेअंतर्गत अहिल्यानगर शहरात एक लाख वृक्षलागवड व संवर्धनाचा संकल्प करण्यात आला आहे. यापैकी आतापर्यंत १५ हजार वृक्षलागवड व संवर्धनाचे उद्दिष्ट पूर्ण झाले आहे. या मोहिमेच्या पुढील टप्प्यात साई द्वारका सेवा ट्रस्ट आणि अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षवाटप उपक्रम राबविण्यात आला. उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून सुरू असलेल्या या उपक्रमाचे आमदार योगेश टिळेकर यांनी कौतुक केले.

यावेळी आमदार योगेश टिळेकर म्हणाले की, समाजात वावरत असताना समाजाचे आपल्यावर काहीतरी ऋण आहे, या भावनेतून प्रत्येकाने आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे. पुढील पिढीसाठी आपण काय ठेवणार, याचा विचार करताना संपत्ती, गाडी आणि बंगला यापेक्षा वृक्षांची सावली आणि पाण्याचे संवर्धन यासाठी काम करणे अधिक महत्त्वाचे आहे. पाणी आणि वृक्षसंवर्धन हे आज समाजासमोरील महत्त्वाचे प्रश्न आहेत.

निसर्गाचा ऱ्हास होत असून, काँक्रीटची जंगले उभी राहत आहेत. या प्रक्रियेत वृक्षतोड होत असली, तरी त्या प्रमाणात प्रामाणिकपणे वृक्षलागवड व संवर्धनाचे प्रयत्न होताना दिसत नाहीत. अशा परिस्थितीत ॲड. धनंजय जाधव यांनी ग्रीन सिटी मोहिमेच्या माध्यमातून वर्षभरात एक लाख वृक्ष लावण्याचा संकल्प केला आहे. त्यापैकी १५ हजार वृक्षलागवड व संवर्धनाचे उद्दिष्ट पूर्ण झाले आहे. पुढील पिढीच्या भवितव्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्रात हरितक्रांती घडविण्याचे काम सुरू आहे. शेतकरी, बळीराजा आणि सर्वसामान्य नागरिक सुखी व समाधानी व्हावेत, या भूमिकेतून शासन विविध प्रयत्न करत आहे. पालकमंत्री ग्रीन सिटी मोहिमेच्या माध्यमातून अहिल्यानगरची ओळख महाराष्ट्रात 'हरित अहिल्यानगर' म्हणून निर्माण होईल. वृक्षारोपण आणि संवर्धन ही केवळ एखाद्या व्यक्तीची जबाबदारी नसून ती सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. देश आणि राज्याच्या विकासासाठी युवकांनी पुढाकार घेऊन ग्रीन सिटी अहिल्यानगर मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहन आमदार टिळेकर यांनी केले.

नगरसेवक निखिल वारे म्हणाले की, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी वृक्षारोपण आणि संवर्धनाची लोकचळवळ उभी केली आहे. या माध्यमातून शहरात मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड झाली असून, ▮ पान ४ वर



दै. आकर्षण निवडक

स्नेहबंध फौंडेशनतर्फे जिल्हास्तरीय किल्ले बनवण्याची स्पर्धा



अहिल्यानगर - दिवाळीत किल्ले बनवण्याची परंपरा जपण्याच्या उद्देशाने स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या वतीने जिल्हास्तरीय किल्ले बनवा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी दिली. दिवाळीत लहान मुले एकत्र येऊन विविध किल्ले साकारतात. लहान मुलांच्या कल्पकतेला वाव देणाऱ्या आणि आपल्या इतिहासाबद्दल जागरुकता निर्माण करणाऱ्या या उपक्रमाला चालना देण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ज्यांना या स्पर्धेत सहभाग घ्यावयाचा आहे, त्यांनी आपले पूर्ण नाव, पत्ता व मोबाईल नंबरसह ११ नोव्हेंबर पर्यंत ८७९३ १९१९१९ या क्रमांकावर मोबाईलवर काढलेला अर्ध्या मिनिटाचा व्हीडिओ व ३ ते ४ फोटो पाठवावे. (जुना व्हिडिओ व फोटो चालणार नाही.) किल्ला दगडमातीचा असावा, पण सजावटीकरता अन्य वस्तू व रंग वापरता येतील. इकोफ्रेंडली किल्ला असल्यास त्यालाही विशेष गुण दिले जाणार आहेत. स्नेहबंधचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली समिती परीक्षण करून पहिल्या तीन स्पर्धकांना मान्यवरांचा उपस्थितीत दिवाळी झाल्यानंतर गौरवण्यात येणार आहे. मागील विजेत्या स्पर्धकांना प्रवेश मिळणार नाही. स्पर्धेत प्रवेश मोफत आहे. स्पर्धेचे प्रायोजक अवनीश क्रिएशन चे संचालक (शिल्पकार) श्री. बालाजी वल्लाल हे आहेत.

भिंगारमध्ये हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने सरदार वल्लभभाई पटेल जयंती उत्साहात



अहिल्यानगर - देशाचे पहिले उपपंतप्रधान व भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त भिंगार येथे हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने विविध सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. वृक्षारोपण, स्वच्छता अभियान आणि एकता रॅलीतील सहभागातून ग्रुपच्या सदस्यांनी राष्ट्रीय एकात्मतेसोबतच पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. वाढते तापमान, पाणीटंचाई आणि दुष्काळाचे संकट लक्षात घेता प्रत्येक नागरिकाने वृक्षारोपण करून त्यांचे संगोपन करावे, पाण्याचा काटकसरीने वापर करावा आणि परिसर स्वच्छ ठेवावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यांच्या राष्ट्रएकात्मतेच्या कार्याचे स्मरण करून उपस्थितांनी राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचा संकल्प केला. यानंतर उद्योजक लॉरेन्स स्वामी व भिंगार छावणी परिषदेचे वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक गणेश भोर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. तसेच परिसरात स्वच्छता अभियान राबवून सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ व सुंदर ठेवण्याचे आवाहन करण्यात आले. हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या सदस्यांनी एकता रॅलीत सहभागी होत राष्ट्रीय एकात्मता, झाडे लावा, पर्यावरण वाचवा आणि पाणी बचतीचा संदेश दिला. या उपक्रमासाठी हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, सचिन चोपडा, जहीर सय्यद, ताराचंद टोकळ, सर्वेश सपकाळ, अशोक पराते, दिलीप ठोकळ, योगेश चौधरी, सुंदरराव पाटील, सखाराम अळकुटे, निजाम पठाण, अभिजीत सपकाळ, विकास भिंगारदिवे, संतोष लुनिया, छावणी परिषदेचे मनोनित सदस्य वसंत राठोड, कार्यालयीन अधीक्षक सुनील शिंदे, मुख्याध्यापक संजय शिंदे, राजेंद्र भोसले, भारुड सर, दिलीपराव पालवे, रतन मेहेत्रे, जोगिंदरसिंग, उमाशंकरसिंग पंडित, सरदारसिंग परदेशी, अविनाश पोतदार, शेषराव पालवे, सुभाष पेंदुरकर, दीपक घोडके, रामनाथ गर्जे, देविदास गंडाळ, कांता वाघुळे, वामन पगारे, महादेव साबळे, बाळासाहेब सूर्यवंशी, विशाल भामरे, बाळासाहेब झिंजे आदी उपस्थित होते.हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ म्हणाले की, सरदार वल्लभभाई पटेल यांनी देशातील विविध संस्थानांना एकत्र आणून राष्ट्रीय एकात्मतेचा भक्कम पाया घातला.

महात्मा ज्योतिराव फुले लोक अदालत महाअभियान अंतर्गत

१५ वर्षांपासूनचा प्रलंबित वाद मिटला

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील साहेब यांच्या समवेत नामदार सुप्रीम कोर्ट मेडिएशन मॉनिटरिंग कमिटी द्वारा प्रशिक्षित मध्यस्थ अँड सुभाष भोर आणि दुसऱ्या प्रशिक्षित मध्यस्थ अँड सौ. अरुणा उन ऊनशणे राशिनकर यांच्या मंचाने २०१२ पासून प्रलंबित असलेला एक वाद यशस्वीरित्या या महाअदालत अभियानामध्ये मध्ये कामोपचारने मिटविण्यात यशस्वी झाले.

नागरदेवळे परिसरातील एका माजी सैनिकाची ही मिळकत प्रत्यक्ष खरेदीखत घेतलेल्या ऐवजी दुसरीकडेच नोंद लागली आणि अनेक कामांमध्ये होत असलेला अडथळा धूर करण्यासाठी स्थानिक पातळीपासून तालुका पातळीवरील तलाठी सर्कल तहसीलदार या सर्व पातळीवर दोन्ही पार्टी गेली बारा वर्ष लढत होत्या त्यामध्ये उपविभागीय अधिकारी यांचे समोरील अपिलामध्ये हा समझोता झाला प्रसिद्ध वकील अँड आर बी तथा राजेंद्र सोमवंशी आणि त्यांचे सहाय्यक अँड दीपक कदमतसेच समोरच्या पार्टीचे वकील अँड चेमटे यांनी या मध्यस्थीकामी सकारात्मक भूमिका घेतली आणि हा अनेक दिवसापासूनचा वाद संपुष्टात आला.

या महा लोक अदालतमध्ये सध्या २०२७ पर्यंत हे अभियान राबविले जाणार असून अनेक नोंदीचे वाद, रस्त्याचे वाद, बांधाचे वाद ,ज्येष्ठ नागरिक संरक्षण कायद्याचे आई बाप सांभाळत नसलेल्या त्यांच्या मुला बाळांच्या विरुद्धचे वाद, तळतोडीसाठी समोर येत असून या अशा प्रांत अधिकारी सुधीर पाटील साहेब यांच्या समोरची कामकाज अशा प्रकारे सामोपचाराने मिटले जातात आणि त्यामध्ये एक सामाजिक कर्तव्य भावना म्हणून सहभागी होण्याची संधी मिळते हा वेगळाच समाधान आणि आनंदाचा भाग आहे.

ज्येष्ठ नागरिक संरक्षण कायद्याप्रमाणे मुलं बाळ सांभाळत नाहीत म्हणून सुशिक्षित नोकरी धंदा किंवा व्यापार करणाऱ्या त्यांच्या मुलांच्या विरुद्ध दाखल झालेल्या तक्रारी काही पाल्य त्यांच्या आई-वडिलांना सन्मानाने घेऊन गेले परंतु त्यासाठी कोर्ट दरबार करणे ही समाजाच्या दृष्टीने अतिशय विदारक परिस्थिती आहे याची जाणीव होते. अशा केसेस मध्ये सुद्धा तडजोडी करत सन्मानजन्य मार्ग काढून या अभियानाला माणुसकीची जोड दिली जाते हे विशेष अॅड. सुभाष भोर प्रशिक्षित मध्यस्थ आणि स्पेशल पब्लिक प्रॉसिक्युटर जीएसटी आणि कस्टम्स भारत सरकार अहिल्यानगर.

डॉ. सुजय विखे पाटील यांनी बजावला मतदानाचा हक्क

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

राहाता– अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी राहाता येथील सेंट जॉन स्कूलमधील मतदान केंद्रावर जाऊन आपल्या मतदानाचा हक्क बजावला.



अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील महत्त्वाची आर्थिक संस्था असून, शेतकरी, कष्टकरी आणि दूध उत्पादकांसाठी भक्कम आधारस्तंभ म्हणून कार्यरत आहे. ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासात तसेच शेतकऱ्यांच्या प्रगतीमध्ये बँकेची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. जिल्ह्यातील सहकार चळवळ अधिक बळकट व्हावी, शेतकऱ्यांचे हित जपले जावे आणि बँकेच्या माध्यमातून सर्वसामान्यांना सक्षम आर्थिक आधार मिळावा, अशी अपेक्षा डॉ विखे यांनी यानिमित्ताने केली

आय.एम.एस.सी.डी.आर.मध्ये राष्ट्रीय एकता दिवस उत्साहात साजरा



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– बी.पी. हिवाळे एज्युकेशन सोसायटीच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (करिअर डेव्हलपमेंट अँड रिसर्च), अहिल्यानगर (आय.एम.एस.सी.डी.आर.) येथे ३१ ऑक्टोबर रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक सलोखा आणि जबाबदार नागरिकत्वाची मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाची सुरुवात भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेस व्यवस्थापन विभागप्रमुख डॉ. हातिम कय्यूमी आणि ग्रंथपाल डॉ. स्वाती बार्नबस यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली. यानंतर विद्यार्थ्यांनी, प्राध्यापकांनी आणि प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी देशाची एकता, अखंडता आणि सुरक्षितता जपण्याची शपथ घेतली. प्रा. तृप्ती कोठारी यांनी इंग्रजी भाषेत, तर प्रा. अजित कुटे यांनी हिंदी भाषेत राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रतिज्ञेचे वाचन केले. विविधतेचा आदर, प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि सामाजिक जबाबदारी यांचे महत्त्व या निमित्ताने अधोरेखित करण्यात आले.

या दिनाचे औचित्य साधून आय.एम.एस.च्या ग्रंथालयातर्फे सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जीवनकार्यावर आधारित पुस्तकांच्या मुखपृष्ठांचे विशेष प्रदर्शन आयोजित करण्यात आले. या प्रदर्शनातून विद्यार्थ्यांना त्यांचे नेतृत्व, संस्थानांच्या विलीनीकरणातील ऐतिहासिक भूमिका आणि भारताच्या एकात्मतेसाठी त्यांनी दिलेले योगदान जाणून घेण्याची संधी मिळाली. राष्ट्रीय एकात्मतेचा विचार वाचन आणि अभ्यासाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा या उपक्रमामागील हेतू होता. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रंथालय विद्यार्थी समितीच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी रेवती माळशे आणि ऐश्वर्या राऊत यांनी केले. छायाचित्रण व व्हिडिओ चित्रीकरणाची जबाबदारी वैभवी कदम, श्रुती सागर, साक्षी शितोळे, मसिरा सय्यद आणि मुस्कान सय्यद यांनी पार पाडली. मंच व्यवस्थापन दीपिका गोरे, साक्षी म्हागडे आणि सानिया शेख यांनी, तर सभास्थळावरील व्यवस्था ग्रंथालय कर्मचारी धनराज घोडके, राजेश कांबळे आणि संदेश पाटोळे, मुकेश बहोत आणि विद्यार्थि मल्हार रहिंज यांनी सांभाळली. या संपूर्ण कार्यक्रमाचे यशस्वी समन्वयन विद्यार्थी ग्रंथालय समिती (२०२६२७) च्या उत्साही सदस्यांनी केले. या उपक्रमाला प्रा. गौरी पाटील, प्रा. श्रुती राव आणि प्रा. सायली तोरणे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

या प्रसंगी संस्थेच्या प्रभारी संचालिका डॉ. प्रणोती तेलोरे आणि उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस यांनी विद्यार्थी समिती तसेच आयोजकांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. कार्यालय अधीक्षक श्री. महेश दीक्षित, लेखापाल श्री. नरेंद्र कदम, ग्रंथालय कर्मचारी श्री. जितिन आढाव, श्री. सिराज मुलाणी, , श्री. विजय पाटोळे, तसेच विविध अभ्यासक्रमांचे विद्यार्थी उपस्थित होते.

चीनमधील बुद्धिबळ खेळणारा रोबोट प्रथमच अहिल्यानगरमध्ये

देशभरातील २०० हून अधिक खेळाडूंचा सहभाग

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– बुद्धिबळप्रेमींसाठी आकर्षण ठरणारी शांतीकुमारजी फिरोदिया अखिल भारतीय खुली आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धा बुधवार, दि. ११ नोव्हेंबर रोजी अहिल्यानगर येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, एस.टी. स्टँड रोड येथे आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे चीनमधून प्रथमच अहिल्यानगरमध्ये बुद्धिबळ खेळणारा अत्याधुनिक रोबोट येणार असून, हा रोबोट प्रत्यक्ष खेळाडूंशी बुद्धिबळाचा डाव खेळणार आहे. त्यामुळे बुद्धिबळप्रेमींसह नागरिकांनाही ही अनोखी संधी अनुभवता येणार आहे.

या स्पर्धेची माहिती अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी दिली. स्पर्धेत देशभरातील विविध राज्यांमधून खेळाडू सहभागी होणार असून, गुजरात, आंध्र प्रदेश, गोवा, तमिळनाडू, तेलंगणा आदी राज्यांतील दोनशेहून अधिक खेळाडूंनी आतापर्यंत आपला प्रवेश निश्चित केला आहे, अशी माहिती संघटनेचे उपाध्यक्ष नरेंद्र कुलकर्णी यांनी दिली.

या स्पर्धेचे विशेष आकर्षण असलेला चीनमधून येणारा बुद्धिबळ यंत्रमानव खेळाडूंशी प्रत्यक्ष बुद्धिबळ खेळणार आहे. नगरमधील तसेच बाहेरगावच्या खेळाडूंना या रोबोटसोबत डाव खेळण्याची संधी मिळणार असून, बुद्धिबळ खेळाडू, पालक आणि प्रशिक्षकांसाठीही हा अनुभव विशेष ठरणार आहे, अशी माहिती संघटनेचे सचिव यशवंत बापट यांनी दिली.

या स्पर्धेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे वयोगटातील मोठी विविधता. अवघ्या साडेचार वर्षांचा बाल खेळाडू ते ८७ वर्षांचे ज्येष्ठ खेळाडू अशा विविध वयोगटांतील बुद्धिबळपटू आपले कौशल्य पणाला लावणार आहेत. बुधवारी सकाळी ११ वाजता स्पर्धेचा शुभारंभ होणार असून, त्यानंतर स्पर्धेतील सामने सुरू होतील. स्पर्धेत एकूण नऊ फेऱ्या होणार आहेत. रविवारी दुपारी ३ वाजता बक्षीस वितरण समारंभ आयोजित करण्यात आला आहे.

स्पर्धेतील विविध गटांमध्ये एकूण पाच लाख रुपयांची प्रोत्साहनपर रोख पारितोषिके, आकर्षक ७० करंडक तसेच सहभागी सर्व खेळाडूंना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचे १०० लाकडी बुद्धिबळ पट आणि सोंगट्यांचा वापर हेही या स्पर्धेचे वैशिष्ट्य राहणार आहे. अशा प्रकारचे १०० आंतरराष्ट्रीय दर्जाचे लाकडी बुद्धिबळ पट भारतात केवळ अहिल्यानगर येथेच वापरले जात असल्याचे आयोजकांनी सांगितले. स्पर्धेचे प्रमुख पंच म्हणून प्रवीण ठाकरे (जळगाव) काम पाहणार असून, पवन राठी (पुणे), शार्दुल टापसे (सातारा), दीपक चव्हाण (वाशिम), शिशिर इंदुरकर (नागपूर), प्रशांत धंगेकर आणि देवेंद्र ढोकळे (अहिल्यानगर) हे सहाय्यक पंच म्हणून जबाबदारी सांभाळणार आहेत. ही स्पर्धा जागतिक बुद्धिबळ संघटना () आणि अखिल भारतीय बुद्धिबळ महासंघाच्या नियमावलीनुसार पार पडणार आहे. शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशनने या स्पर्धेला प्रायोजकत्व दिले आहे. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे सदस्य सुबोध ठोंबरे, परूनाथ ढोकळे, शाम कांबळे, मनीष जसवानी, प्रकाश गुजराती, चेतन कड, सचिन कांबळे (पाथर्डी), शिवा काळे (श्रीरामपूर), कु. दुर्गा ढोकळे (शेवगाव), संकेत गाडे (कोपरगाव), संजय खडके, नवनीत कोठारी, दत्ता घाडगे, अतुल कोठारी, सौ. शुभदा ठोंबरे, डॉ. स्मिता वाघ आणि सौ. रोहिणी आडकर आदी प्रयत्नशील आहेत.

दिवाळीच्या बाजारपेठेत शुकशुकाट; दुष्काळाने खरेदीचा उत्साह हिरावला

पैठणसह ग्रामीण आठवडे बाजारांत व्यापाऱ्यांनी भरला माल; ग्राहकांची पाठ, आर्थिक उलाढाल मंदावली

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

पैठण– दिवाळीचा सण तोंडावर येऊन ठेपला असून, पैठणसह आडूळ, बालानगर, पाचोड, बिडकीन, लोहगाव, विहामांडवा, जायकवाडी आदी परिसरांतील आठवडे बाजारपेठा विविध वस्तूंनी सजल्या आहेत. सणाच्या पार्श्वभूमीवर व्यापाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात माल भरून दुकाने थाटली; मात्र बाजारपेठेत ग्राहकांची अपेक्षित गर्दी नसल्याने व्यापाऱ्यांच्या चेहऱ्यावर चिंतेचे सावट पसरले आहे.

यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने पैठण तालुक्यातील ग्रामीण भागात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतीचे उत्पादन घटल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. त्यातच महागाईने सर्वसामान्यांचे आर्थिक गणित कोलमडले असून, दिवाळीचा सण साजरा करताना नागरिकांना खर्चावर मर्यादा आणाव्या लागत आहेत.



दिवाळीनिमित्त बाजारपेठांमध्ये आकाशकंदील, पणत्या, लक्ष्मीमूर्ती, रांगोळी, सजावटीच्या वस्तू, कपडे, मिठाई आणि फराळाच्या साहित्याची दुकाने सजली आहेत. ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी व्यापाऱ्यांनी विविध प्रकारच्या वस्तू उपलब्ध करून दिल्या आहेत. मात्र, बाजारात ग्राहकांची वर्दळ कमी असून, खरेदीसाठी येणारे नागरिकही आवश्यक वस्तूंचीच खरेदी करताना दिसत आहेत.

दुष्काळाचा थेट बाजारपेठेवर परिणाम

ग्रामीण भागातील गोरगरीब जनता शेती आणि शेतमजुरीवर अवलंबून आहे. यंदा पावसाअभावी शेतीच्या उत्पन्नावर परिणाम झाल्याने नागरिकांची खरेदी क्षमता घटली आहे. परिणामी, दिवाळीसारख्या मोठ्या सणातही बाजारपेठांमध्ये अपेक्षित उलाढाल होत नसल्याचे चित्र आहे. सणासाठी मोठ्या प्रमाणात मालाची गुंतवणूक केलेल्या छोट्या व्यापाऱ्यांना ग्राहकांची प्रतीक्षा करावी लागत आहे. एकीकडे दिवाळीच्या स्वागतासाठी बाजारपेठा सज्ज झाल्या असताना दुसरीकडे दुष्काळ आणि महागाईने सर्वसामान्यांच्या सणाच्या आनंदावर विरजण घातले आहे. ग्राहकांची घटलेली क्रयशक्ती आणि मंदावलेली उलाढाल यामुळे यंदाची दिवाळी व्यापाऱ्यांसाठी आर्थिक संकटाची ठरत आहे.

नाथसागरात ७२.२२ टक्के पाणीसाठा; गतवर्षी याच दिवशी १०० टक्के

यंदा पाणीसाठ्यात घट; जिवंत पाणीसाठा ५५.३६ टीएमसी, कालवा विसर्ग बंद

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

पैठण– पैठण येथील नाथसागर जलाशयात सोमवार, दि. २ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वाजेच्या आकडेवारीनुसार ७२.२२ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. धरणातील एकूण पाणीसाठा ८१.४२ टीएमसी, तर जिवंत पाणीसाठा ५५.३६ टीएमसी इतका नोंदविण्यात आला आहे.

यंदा पावसाळ्यात जलाशयात १ जूनपासून आतापर्यंत ६६.६२५ टीएमसी पाण्याची आवक झाली आहे. तर याच कालावधीत ५.७८८२ टीएमसी पाण्याचा विसर्ग करण्यात आला आहे. सध्या धरणाची पाणीपातळी १ हजार ५१६.५१ फूट असून, पैठण उजवा कालवा, डावा कालवा आणि जलविद्युत केंद्रातून कोणताही विसर्ग सुरू नाही. दरम्यान, गतवर्षी २ नोव्हेंबर रोजी नाथसागरात १०० टक्के उपयुक्त पाणीसाठा होता. त्या तुलनेत यंदा पाणीसाठा ७२.२२ टक्क्यांवर आला आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा जलाशयातील पाणीसाठ्यात लक्षणीय घट दिसून येत असल्याने आगामी काळातील पाणी नियोजनाकडे शेतकरी आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे.



निमातर्फे अहिल्यानगर येथे कुलगुरू आणि विद्यापीठ अधिकाऱ्यांचा सत्कार



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– विद्यापीठाची ही वाटचाल डॉ. राधाकृष्ण विखे पाटील आणि डॉ. सुजय राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अथक प्रयत्नांमुळे शक्य झाली आहे अशी भावना व्यक्त करत नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन (निमा) तर्फे डॉ. बाळासाहेब विखे पाटील विद्यापीठ अहिल्यानगरचे कुलगुरू डॉ.मोहन खामगावकर आणि वरिष्ठ विद्यापीठ अधिकाऱ्यांचा वैद्यकीय शिक्षणातील नेतृत्व आणि योगदाना बद्दल सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात डॉ. अभिजित दिवटे (संचालक, वैद्यकीय), डॉ. मोहन खामगावकर (कुलगुरू), डॉ. सुनील नाथा म्हस्के (प्र-कुलगुरू), डॉ. राहुल घोणे (कुलसचिव), डॉ. विजय पाटील (अधिष्ठाता, डीव्हीव्हीपीएफ वैद्यकीय महाविद्यालय, अहिल्यानगर) आणि डॉ. जहीर मुजावर (प्रभारी, पात्रता विभाग) यांचा सत्कार निमाचे अध्यक्ष डॉ. महेश मुळे,सचिव डॉ.प्रशांत महांदुले, खजिनदार डॉ. शांतीलाल कटारिया आणि निमा महिला मंचच्या अध्यक्षा डॉ.रत्ना बल्लाळ यांच्या हस्ते करण्यात आला. वैद्यकीय शिक्षण बळकट करण्यासाठी व्यावसायिक उत्कृष्टतेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि आरोग्य सेवांच्या विकासाला पाठबळ देण्यासाठी व्यावसायिक वैद्यकीय संघटना आणि शैक्षणिक संस्था यांच्यातील सहकार्याचे महत्त्व या कार्यक्रमात अधोरेखित करण्यात आले. या निमित्ताने विद्यापीठाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाची आणि योगदानाची दखल घेण्याची तसेच निमा आणि विद्यापीठ यांच्यातील सहकार्याची भावना अधिक दृढ करण्याची संधी मिळाली.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा
फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

दै. आकर्षण निवडक

५ नोव्हेंबरला विद्यापीठे व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा मोर्चा

अहिल्यानगर- महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक विद्यापीठे व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी संयुक्त कृती समितीतर्फे ५ नोव्हेंबर २०२६ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ते उच्च शिक्षण संचालक कार्यालयावर धडक मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा प्रलंबित मागण्यांना त्वरित न्याय मिळावा यासाठी राज्यातील सर्व विध्यापीठे व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संयुक्त कृती समिती आणि महाराष्ट्र राज्य शिक्षकेतर कर्मचारी महासंघ वतीने आंदोलन पुकारण्यात आले असल्याची माहिती जिल्हा शिक्षकेतर कर्मचारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष वैभव रोडी, उपाध्यक्ष बाळासाहेब इघे व सचिव संतोष कानडे यांनी दिली.या मोर्चात जिल्हातील सर्व संघटनाचे पदाधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आंदोलन यशस्वी करावे असे आवाहन महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष प्रकाश म्हसे, महासचिव रावसाहेब त्रिभुवन तसेच संयुक्त कृती समितीचे प्रमुख अजय देशमुख यांनी केले आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत आश्वासित योजनेचे १०,२० आणि ३० वर्षाचे तीन लाभ तात्काळ लागू करणे, विद्यापीठे व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आठवड्यातून पाच दिवसांचे काम लागू करणे, प्रयोगशाळा व ग्रंथालय परिचरांना सुधारीत ग्रेड पे वेतन लागू करणे, विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे तात्काळ भरणे आणि कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करणे या मागण्यांसाठी शासनाचे लक्ष वेधले जाणार आहे.

सह्याद्रीच्या जंगलरक्षणासाठी भीमाशंकर सत्याग्रह

अहिल्यानगर- सह्याद्री पर्वतरांगांतील वनसंपदा, वन्यजीवांचे अधिवास आणि पर्यावरणाचे संरक्षण करण्याबाबत महाराष्ट्र सरकारने संवेदनशील भूमिका घ्यावी, या मागणीसाठी पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेच्या वतीने 'भीमाशंकर सत्याग्रह' आंदोलन करण्यात आले. हुतात्मा स्मारक येथे करण्यात आलेल्या या आंदोलनात मंत्रिमंडळाच्या प्रतीकात्मक दगडांना शेंदूर लावून त्यावर गोमूत्र शिंपडण्यात आले. शासनाच्या कथित पर्यावरणविरोधी भूमिकेचा निषेध करत आंदोलकांनी मंत्रिमंडळाला 'जंगलमारी कॅबिनेट' आणि 'दगडभेजा मंत्रिमंडळ' जाहीर केले. या आंदोलनात ॲड. कारभारी गवळी, अशोक सब्बन, वीर बहादूर प्रजापती, दिगंबर साबळे, दत्तात्रय साबळे, अभिमान शिंदे, चतुरा शिंदे, पोपट भोसले, अशोक भोसले, बाबासाहेब भोसले, ज्ञानदेव चांदणे, राजू उमाप, सनी शिंदे, राहुल आढाव, आनंदा आढाव आदी सहभागी झाले होते.

नेप्ती येथील नारायण औटी यांचे निधन

अहिल्यानगर - नगर तालुक्यातील नेप्ती येथील नारायण सिताराम औटी (देवा) वय ८० वर्षे यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने नेप्ती परिसरासह संपूर्ण पंचक्रोशीत हळहळ व्यक्त होत आहे. नारायण औटी हे परिसरात 'नारायण देवा' या नावाने परिचित होते. त्यांनी अनेक वर्षे पुरोहित म्हणून धार्मिक विधी व पौरोहित्याचे कार्य केले. या माध्यमातून त्यांचे पंचक्रोशीतील अनेक कुटुंबांशी जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले होते. धार्मिक कार्यातील त्यांचे योगदान आणि मनमिळाऊ स्वभाव यामुळे ते सर्वपरिचित होते. त्यांच्या निधनाची बातमी समजताच नातेवाईक, मित्रपरिवार आणि परिसरातील नागरिकांनी शोक व्यक्त केला. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी अश्विनी औटी, पुतणे अभिजीत औटी, अक्षय औटी व अमोल औटी, सुना, जावा तसेच नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने औटी कुटुंबावर शोककळा पसरली असून, परिसरातून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

दिवाळीचा आनंद वंचित मुलांच्या चेहऱ्यावर फुलवला!

राहुल अमृत फ्रेंड सर्कलचा स्तुत्य उपक्रम; बालघर प्रकल्पातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, फराळ आणि फटाक्यांचे वाटप



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– दिवाळी म्हणजे आनंद, उत्साह आणि आपुलकीचा सण! मात्र समाजातील प्रत्येक घटकापर्यंत हा आनंद पोहोचतोच असे नाही. याच जाणिवेतून राहुल अमृत फ्रेंड सर्कलच्या वतीने बालघर प्रकल्पातील वंचित विद्यार्थ्यांसोबत दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्यात आला. केवळ स्वतःचा सण साजरा न करता गरजू मुलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्याचा संवेदनशील उपक्रम राबवत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, अल्पोपहार व भोजन तसेच फटाक्यांचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमामुळे बालघर प्रकल्पातील विद्यार्थ्यांच्या दिवाळीत आनंदाचे रंग भरले. शालेय साहित्यामुळे शिक्षणाला प्रोत्साहन मिळाले, तर फटाके आणि खाऊमुळे मुलांचा उत्साह द्विगुणित झाला. समाजातील वंचित घटकांपर्यंत सणाचा आनंद पोहोचविणे हीच खऱ्या अर्थाने दिवाळीची शिकवण असल्याचे या उपक्रमातून अधोरेखित झाले.

यावेळी राहुल अमृत यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, ''दिवाळीचा खरा आनंद हा केवळ आपल्या घरात दिवे लावण्यात नाही, तर दुसऱ्यांच्या आयुष्यात आनंदाचा प्रकाश निर्माण करण्यात आहे. समाजातील वंचित मुलांनाही सणाचा आनंद घेता यावा, त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलावे आणि त्यांना आपणही समाजाचा महत्त्वाचा भाग आहोत, याची जाणीव व्हावी, या भावनेतून हा छोटासा प्रयत्न केला आहे. भविष्यातही सामाजिक बांधिलकी जपत अशा उपक्रमांच्या माध्यमातून गरजूंच्या मदतीसाठी आम्ही सदैव पुढे राहू.

या उपक्रमात अनिरुद्ध गणेश उपरे, सोहम मारुती घुले, हर्षद तुकाराम केदार, यश शिवलेकर, अंगराज भुजबळ, अनुष भंडारी, कार्तिक गव्हाणे, साईनाथ गाळीतकर, रोहन गीतखाने, दिग्विजय पवार, योगेश गायकवाड, दर्शन हसनाले, आदित्य बाचकर, प्रज्वल काटकर, अनिकेत सुसे, अर्पण साळवे, ओम् शिर्के, कैलासराव जाधव सर, श्रेयस रासने यांच्यासह राहुल अमृत फ्रेंड सर्कलचे सर्व सदस्य उपस्थित होते.

दिव्यांच्या रोषणाईपेक्षा माणुसकीचा प्रकाश मोठा असतो, याची जाणीव करून देणारा राहुल अमृत फ्रेंड सर्कलचा हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचा आदर्श ठरला.

प्रभाग क्रमांक ९ मध्ये कामाचा माणूस म्हणून संदीप भाऊ दातरंगे यांची ओळख

दातरंगे मळा येथे फेस टू ची नवीन पाईपलाईन टाकण्याच्या कामाचा शुभारंभ

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– शहरातील प्रभाग क्रमांक ९ मध्ये परिसरातील कॉलनीचा पाणीपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी फेज टू अंतर्गत नवीन पाईपलाईन टाकण्याच्या कामाला एक नोव्हेंबर रोजी सुरुवात करण्यात आली. जुनी पाईपलाईन बंद करून नवीन पाईपलाईन टाकण्याच्या या महत्त्वपूर्ण कामाचा शुभारंभ नगरसेविका रूपाली संदीप भाऊ दातरंगे यांच्या हस्ते करण्यात आला. या कामाच्या निमित्ताने संदीप भाऊ दातरंगे यांच्या काम करण्याच्या पद्धतीची परिसरात विशेष चर्चा रंगली, काम सुरू करण्यापूर्वी केवळ नारळ फोडून उदघाटनाचा गाजवाजा करण्याऐवजी प्रत्यक्षात काम पूर्ण झाल्यानंतर कामाची पाहणी करण्यात आली आणि त्यानंतर नारळ फोडण्यात आला. त्यामुळे उपस्थित नागरिकांनी या कार्यपद्धतीचे कौतुक केले. आधी काम मग उदघाटन या भूमिकेतून नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देणारे संदीप भाऊ दातरंगे हे प्रभागातील कामाचा माणूस असल्याची भावना यावेळी नागरिकांनी व्यक्त केली.

राज्य शासनाचा आयडियल शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल टी. एम. बी. राजेभोसले यांचा सन्मान

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



पैठण– पैठण तालुक्यातील गोलवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शिक्षिका श्रीमती टी. एम. बी. राजेभोसले यांना राज्य शासनाचा आयडियल शिक्षक पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल पैठण शाहू ग्रुपच्या वतीने त्यांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.

राज्य शासनाच्या आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड होणे ही पैठण तालुक्यासाठी अभिमानाची बाब असून, त्यांच्या शैक्षणिक कार्याची आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या योगदानाची ही पोचपावती असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. या सत्कारप्रसंगी पत्रकार हारून शेख, व्यापारी सतीश लखोटिया, व्यापारी संदीप माने, डॉ. बद्रीनाथ आढाव आदी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी राजेभोसले यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

ओबीसी समाजाच्या सन्मानासाठी भाजप कार्यरत – आमदार योगेश टिळेकर

भाजपा ओबीसी मोर्चाच्या अहिल्यानगर शहर दक्षिण–उत्तर पदाधिकाऱ्यांची बैठक
प्रदेशाध्यक्ष आमदार योगेश टिळेकर यांचे मार्गदर्शन



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– भारतीय जनता पक्षाच्या ओबीसी मोर्चाच्या अहिल्यानगर शहर दक्षिण व उत्तर विभागातील पदाधिकाऱ्यांची बैठक प्रदेशाध्यक्ष आमदार योगेश टिळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली. केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून ओबीसी समाजासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासह समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी संघटितपणे काम करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

यावेळी आमदार योगेश टिळेकर म्हणाले की, ओबीसी समाजाच्या सन्मानासाठी भारतीय जनता पक्ष काम करत आहे. केंद्र आणि राज्य सरकारने ओबीसी समाजाच्या विकासासाठी विविध योजना कार्यान्वित केल्या आहेत. या योजनांचा लाभ समाजातील प्रत्येक पात्र घटकापर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आहे. सुमारे ५४ टक्के ओबीसी समाजाला एकत्रित करून त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी संघटितपणे काम करणे आवश्यक आहे. भाजप हा कार्यकर्त्यांचा विचार करणारा पक्ष असून, कार्यकर्त्यांच्या माध्यमातून पक्षाचे विचार आणि शासनाच्या योजना जनतेपर्यंत पोहोचविल्या जातात.

लवकरच प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचा उत्तर महाराष्ट्र दौरा सुरू होणार असून, या दौऱ्यात भाजप ओबीसी मोर्चाही सहभागी होणार आहे. या पार्श्वभूमीवर सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकत्रितपणे काम करावे. आगामी २०२९ च्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी सक्रियपणे योगदान द्यावे, असे आवाहन टिळेकर यांनी केले.

यावेळी उपमहापौर ॲड. धनंजय जाधव म्हणाले की, पक्षवाढीसाठी प्रत्येक पदाधिकाऱ्याने जबाबदारीने काम करणे आवश्यक आहे. शासनाच्या विविध योजना जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घ्यावा. पक्षाने दिलेल्या पदाचा उपयोग जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी करावा. पदाधिकारी हा पक्षाचा महत्त्वाचा घटक असून, त्याच्या माध्यमातून शासनाच्या योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचे काम प्रभावीपणे होऊ शकते, असे त्यांनी सांगितले. शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांनी पक्षाची ध्येयधोरणे, संघटनात्मक बांधणी आणि पदाधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्या याबाबत सविस्तर चर्चा केली. या बैठकीस उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, नगरसेवक निखिल वारे, विनोद दळवी, ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष गणेश विद्ये, ॲड. सुधीर पोटे, बाबासाहेब सानप, रोहन सानप, अभिजीत बोरुडे, प्रिया दानवे, स्वाती शिरसुल, ज्योती दांडगे, श्रीकांत फंड, महेश गुगळे, ज्ञानेश्वर दुधाडे, विनोद बोगा, ॲड. राजेश गाली यांच्यासह ओबीसी मोर्चाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आनंदऋषीजी रुग्णालयात तिळ्यांची सुखरूप प्रसूती

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– येथील आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये ३१ वर्षीय महिलेची तिळ्यांची (तीन बाळांची) प्रसूती सिझेरियन शस्त्रक्रियेद्वारे यशस्वीरीत्या करण्यात आली. विशेष म्हणजे, ही गर्भधारणा नैसर्गिकरीत्या झालेली असल्याने ही घटना वैद्यकीय क्षेत्रात अत्यंत दुर्मिळ मानली जात आहे.

सदर महिलेच्या पहिल्या तिमाहीतील सोनोग्राफीमध्ये तीन बाळांची गर्भधारणा असल्याचे निदान झाले होते. ही बाब समजल्यानंतरही महिलेने आत्मविश्वासाने गर्भधारणा पुढे सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला. स्त्रीरोगतज्ज्ञांच्या नियमित देखरेखीखाली आणि वेळोवेळी आवश्यक तपासण्या करून गर्भधारणा ३५ आठवड्यांपर्यंत यशस्वीरीत्या सांभाळण्यात आली.

आई आणि तिन्ही बाळांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ३५ आठवड्यांनंतर सिझेरियन शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला. स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. तृप्ती पाटील–दरंदले आणि डॉ. मुथा यांनी ही शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडली. भूलतज्ज्ञ म्हणून डॉ. वैष्णवी आणि डॉ. क्षीरसागर, तसेच बालरोगतज्ज्ञ आणि परिचारिका पथकाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

या शस्त्रक्रियेद्वारे दोन मुली आणि एका मुलाचा जन्म झाला. त्यांचे वजन अनुक्रमे २.२ किलो, २ किलो आणि १.९ किलो होते. विशेष म्हणजे, आई आणि तिन्ही बाळांची प्रकृती उत्तम असून प्रसूतीनंतर दुसऱ्याच दिवशी (३) त्यांना रुग्णालयातून सुखरूप घरी सोडण्यात आले.

यावेळी डॉ. तृप्ती पाटील यांनी सांगितले की, कृत्रिम गर्भधारणा तंत्रज्ञानामुळे ( ) तिळ्यांची गर्भधारणा होण्याचे प्रमाण तुलनेने अधिक असते; मात्र नैसर्गिक गर्भधारणेतून तीन बाळांचा जन्म होणे ही अत्यंत दुर्मिळ घटना असून साधारणत ८,००० प्रसूतींमागे अशी एक घटना आढळते.

अशा गुंतागुंतीच्या गर्भधारणेमध्ये स्त्रीरोगतज्ज्ञांकडून नियमित आणि काटेकोर निरीक्षण, योग्य वेळी प्रसूतीचा निर्णय तसेच अनुभवी स्त्रीरोगतज्ज्ञ, भूलतज्ज्ञ, बालरोगतज्ज्ञ आणि प्रशिक्षित परिचारिका पथक यांच्यातील समन्वय अत्यंत महत्त्वाचा असतो. या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे आई आणि तिन्ही नवजात बालकांची सुखरूप प्रसूती शक्य झाली.

आनंदऋषीजी रुग्णालयातील या यशस्वी शस्त्रक्रियेबद्दल वैद्यकीय क्षेत्रातून कौतुक होत आहे.

अशा प्रकारच्या गुंतागुंतीच्या आणि उच्च जोखमीच्या प्रसूतींसाठी आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये १८ खाटांचे अत्याधुनिक व सर्व सुविधांनी सुसज्ज नवजात शिशू अतिदक्षता विभाग () उपलब्ध आहे. या विभागात प्रशिक्षित आणि अनुभवी वैद्यकीय व परिचारिका पथक कार्यरत असून, डॉ. गुट्टे, डॉ. दीपी अग्रवाल आणि डॉ. वैभवी वंजारी यांच्या मार्गदर्शनाखाली नवजात बालकांची विशेष काळजी घेतली जाते. अशा सक्षम सुविधेमुळे अकाली जन्मलेल्या किंवा विशेष वैद्यकीय निगा आवश्यक असलेल्या नवजात बालकांना तातडीने आणि दर्जेदार उपचार उपलब्ध करून देणे शक्य होते.

कर्करोगाविषयी मनात भीती नको योग्य माहिती हवी– कॅन्सर तज्ज्ञ डॉ. प्रियंका पठारे

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– कर्करोग म्हणजे काय आणि तो कशामुळे होतो याची माहिती असणे गरजेचे आहे दिवसेंदिवस कर्करोगांच्या रुग्णांचे प्रमाणे वाढत आहे आपले शरीर वेगवेगळ्या पद्धतीच्या पेशींनी बनलेले असते. या पेशी नॉर्मल वेगाने डिव्हाईड होत असतात. या पेशी जेव्हा अनियमित आणि अनियंत्रित प्रमाणात वाढतात, तेव्हा त्या आपल्या शरीरामध्ये गाठ बनवतात. गाठ ही चांगल्या प्रकारची (बिनाईन) जी न पसरणारी आणि शरीराच्या इतर भागात न जाणारी असू शकते, ज्याला आपण कॅन्सर म्हणत नाही. परंतु, ज्या गाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी रक्ताद्वारे किंवा लिम्फॅटिक सिस्टीमद्वारे पोहोचू शकतात, त्यांना (मॅलिग्नंट) म्हणजेच कर्करोग असे म्हणतात. कर्करोग हा अजिबात संसर्गजन्य आजार नाही. पेशींची रचना अनियमित पद्धतीने झाल्यामुळे किंवा पेशी वाढल्यामुळे आजार तयार होतो. कर्करोगाविषयी मनात भीती नको, योग्य माहिती हवी,लक्षणांकडे दुर्लक्ष नको वेळेवर तपासणी करायला हवी असे प्रतिपादन विखे मेमोरियल हॉस्पिटलच्या कर्करोगतज्ञ डॉ.प्रियंका पठारे यांनी केले .अपंग संजिनी सोसायटी, मूकबधिर विद्यालय सावेडी,अहिल्यानगर व डी.बी. फाउंडेशन, पुणे

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत कॅन्सर तपासणी व मार्गदर्शन शिबिरा प्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी सामाजिक कार्यकर्त्या,संघर्ष प्रतिष्ठानच्याअध्यक्षा



किरण बारस्कर डॉ. आश्विनी बोरुडे डी.बी. फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा, खजिनदार दिपाली भावले / ताटे,चेअरमन. मधुकर भावले संचालिका विद्या भावले ,डॉ. गिरीश वाठ ,सुभाष पठारे माजी नगरसेविका मिना बोज्रा,दिलीप जगधने शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व पालक उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ.पठारे म्हणाल्या की भारतामध्ये कर्करोगाचे सर्वात महत्त्वाचे कारण तंबाखू, गुटखा, पान मसाला, सिगारेट, बीडी आणि महिलांमध्ये मिश्री लावणे हे आहे.तंबाखू आणि दारू दोन्हीचे सेवन करणाऱ्यांमध्ये कर्करोगाची तिप्पट किंवा त्याहून अधिक जोखीम असते. अयोग्य आहार जंक फूड पिझ्झा-बर्गर खाणे यामुळे गर्भाशयाचा कॅन्सर, ब्रेस्ट कॅन्सर आणि पोटाचे किंवा आतड्याचे कॅन्सर होण्याची कारणे आहेत. भारतीय महिलांमध्ये स्तनानाचा कर्करोग वाढत्या प्रमाणात आढळतो. स्तनात गाठ किंवा गाठीमध्ये गाठ असणे, त्वचेमध्ये बदल होणे, त्वचा आत ओढली जाणे किंवा कडकपणा असणे ही याची लक्षणे आहेत. गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग हा महिलांमध्ये आढळणारा आणखी एक प्रमुख कर्करोग आहे. वाढत्या वयात पाळी अनियमित होणे, पाळी बंद झाल्यानंतर रक्तस्त्राव होणे किंवा संभोगानंतर रक्तस्त्राव होणे ही याची लक्षणे आहेत. लक्षणे दिसण्यापूर्वी किंवा अगदी सुरुवातीच्या स्टेजला कर्करोग शोधून काढण्यासाठी आणि त्यावर लवकर उपचार सुरू करण्यासाठी स्क्रीनिंग तपासण्या करणे महत्त्वाचे आहे. कर्करोग सुरुवातीच्या टप्प्यात असेल तर सर्जरी करून गाठ काढून टाकणे हा सर्वात प्रभावी उपाय आहे. कर्करोग हा पूर्णपणे बरा होऊ शकतो महिलांनी संकोच न बाळगता लक्षणे दिसल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्यावा असे त्या म्हणाल्या.

किरण बारस्कर म्हणाल्या की आरोग्य विषयी जनजागृती ही काळाची गरज आहे. घरातील स्त्री जर आरोग्यविषयक जागरूक असेल तर ती संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडू शकते. प्रत्येक महिला आपल्या शरीरात होणाऱ्या छोट्या-मोठ्या बदलांकडे अनेकदा दुर्लक्ष करते मात्र हे बदल भविष्यात मोठ्या आजारांना आमंत्रण देऊ शकतात. त्यामुळे महिलांनी नेहमी सतर्क राहणे आणि आरोग्याची काळजी घेणे ही काळाची गरज आहे.सध्याच्या धावपळीच्या युगात प्रत्येकाच्या आरोग्यावर परिणाम झाला आहे. घरातील एका जागरूक स्त्रीमुळे समाजात आणि कुटुंबात मोठा सकारात्मक बदल घडून येऊ शकतो.शरीरात होणाऱ्या छोट्या-मोठ्या लक्षणांकडे दुर्लक्ष न करता वेळीच वैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक आहे. अपंग संजीवनी सोसायटीने राबवलेला हा उपक्रम स्तुत्य असल्याचे म्हणाल्या.

प्रस्ताविका .बी. फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा दिपाली भावले /ताटे, म्हणाल्या की कॅन्सर म्हणजे मृत्यू नव्हे, तर योग्य वेळी निदान झाल्यास हा आजार पूर्णपणे बरा होऊ शकतो आजच्या धावपळीच्या युगात आरोग्य विषयी अनेक समस्या आहेत.

सामाजिक बांधिलकीतून समाजाचे ऋण फेडावे : आमदार संग्राम जगताप

कै. दिलीपभाऊ शिंदे यांच्या चौथ्या पुण्यस्मरणानिमित्त कीर्तनसेवा व सामाजिक कार्यकर्त्यांचा सन्मान सोहळा



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– समाजात वावरत असताना प्रत्येकाने समाजाचे काहीतरी देणे लागते, या भावनेतून सकारात्मक दृष्टिकोन ठेवून सामाजिक बांधिलकी जोपासावी आणि आपले कर्तव्य पार पाडावे, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

कल्याण रोड येथील महालक्ष्मी लॉन येथे कै. दिलीपभाऊ बद्रीनारायण शिंदे यांच्या चौथ्या पुण्यस्मरणानिमित्त रामायणाचार्य ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांच्या कीर्तनसेवेचे आयोजन करण्यात आले होते. याच कार्यक्रमात सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी आमदार जगताप म्हणाले की, ॲड. युवराज शिंदे हे आपले वडील कै. दिलीपभाऊ शिंदे यांच्या कार्याचा वारसा पुढे चालवत धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्राबरोबरच वृक्षारोपण आणि संवर्धनाचे काम सातत्याने करत आहेत. वडिलांच्या चौथ्या पुण्यस्मरणानिमित्त कीर्तनसेवेचे आयोजन करून संतांचे विचार समाजापर्यंत पोहोचविण्याचे काम त्यांनी केले. तसेच सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करून त्यांच्या कार्याला प्रोत्साहन दिले आहे.

संत गाडगेबाबा यांनी त्या काळात गावोगावी फिरून कीर्तनाच्या माध्यमातून समाजाला स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. त्याच विचारांचा वारसा पुढे नेत अजय चितळे यांच्या माध्यमातून शहरात दर रविवारी स्वच्छता मोहीम राबविली जाते. अनामप्रेम संस्थेच्या माध्यमातून अनाथ, अंध आणि दिव्यांग मुलांचा सांभाळ करून त्यांच्यासाठी शिक्षणाची दारे खुली करण्याचे काम इंजिनियर अजित माने यांनी केले याचबरोबर तपोवन रोड येथे युवराज गुंड यांनी बालघर प्रकल्प सुरू करून अनाथ मुलांच्या शिक्षणाची सोय केली

अरुणोदय गोशाळेच्या माध्यमातून मनीष फुलडहाळे सुमारे अडीचशे गायींचा सांभाळ करत आहेत. या गोसेवेच्या कार्यासाठी समाजातील अनेक लोक मदतीचा हात देत असतात. पारुनाथ ढोकळे सर यांनी कल्याण रोड परिसरातील नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला आहे. वंदना कुलकर्णी यांचा अनाथ मुलांना शालेय साहित्य वाटप करण्याचा उपक्रमही कौतुकास्पद आहे.

ॲड. युवराज शिंदे यांनी आपल्या वडिलांच्या पुण्यस्मरणानिमित्त विविध क्षेत्रांत उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करून त्यांच्या कार्याची दखल घेतली आहे. या भागाच्या विकासासाठीही ते सातत्याने प्रयत्नशील आहेत. निवडणुकीत त्यांचा पराभव झाला असला, तरी त्यांनी सामाजिक कार्य थांबविलेले नाही. समाजासाठी काम करण्याची त्यांची भूमिका कायम असल्याचे आमदार जगताप यांनी नमूद केले.

रामायणाचार्य ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांनी कीर्तनसेवेच्या माध्यमातून आई-वडिलांचे जीवनातील महत्त्व, संत ज्ञानेश्वरांचे कार्य, मराठी भाषेचे महत्त्व तसेच समाजात वावरताना माणसाने कसे आचरण ठेवावे, याविषयी विविध उदाहरणांसह मार्गदर्शन केले. संतविचारांच्या माध्यमातून जीवनमूल्ये जपण्याचा संदेश त्यांनी दिला.

यावेळी महापौर ज्योतीताई गाडे आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांनी कै. दिलीपभाऊ शिंदे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. ते म्हणाले की, प्रत्येकाच्या जीवनात आई-वडिलांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे असते. ॲड. युवराज शिंदे यांनी आपल्या वडिलांनी दिलेली शिकवण आणि त्यांचा सामाजिक कार्याचा वारसा पुढे सुरू ठेवला आहे.

अहिल्यानगर सकल माळी समाज संस्थेचा वधू-वर मेळावा राज्यासाठी आदर्श – आ. योगेश टिळेकर

अहिल्यानगरचा वधू-वर मेळावा ठरला राज्यस्तरीय; ६०० बायोडाटांची विक्रमी नोंदणी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– लग्न जमविणे हा समाजात मोठा ज्वलंत प्रश्न निर्माण झाला आहे. माळी समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी वधू-वर मेळाव्याचे नियोजन करून अहिल्यानगर सकल माळी समाज संस्थेने समाजाच्या व्यवस्थेसाठी पुढाकार घेतला आहे. या वधू-वर मेळाव्याला जिल्ह्यातून मोठा प्रतिसाद मिळाला आहे. याबरोबरच संभाजीनगर, पुणे, नाशिक, विदर्भ, सातारा, पनवेल, मुंबई, मराठवाडा येथील समाजबांधव मोठ्या संख्येने आल्याने या मेळाव्याला जिल्हास्तरीय जरी म्हटले असले तरी हा मेळावा राज्यासाठी एक आदर्श मेळावा ठरला आहे, असे प्रतिपादन भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष आ. योगेश टिळेकर यांनी केले.

अहिल्यानगर सकल माळी समाज संस्थेच्या वतीने माळी समाज वधू-वर परिचय मेळावा बंधन लॉन्स, सावेडी येथे पार पडला.या मेळाव्याचा उद्घाटन सोहळा भाजप ओ.बी.सी.मोर्चा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आ.योगेश टिळेकर यांच्या हस्ते संपन्न झाला.

याप्रसंगी विशेष उपस्थिती म्हणून आ. संग्राम जगताप, कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आ. पांडुरंग अभंग,स्वागताध्यक्ष उपमहापौर धनंजय जाधव, संस्थेचे अध्यक्ष किशोर डागवाले,आयोजक उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, माजी उपमहापौर अनिल बोरुडे,नामदेव राऊत (प्रथम नगराध्यक्ष, कर्जत),डॉ. स्वाधीन गाडेकर (नगराध्यक्ष, राहाता),सौ.सुनिता खेतमाळीस (नगराध्यक्षा, श्रीगोंदा),अर्जुनराव बोरुडे, जि.प. सदस्य शरद झोडगे, महेश झोडगे,अहिल्यानगर सकल माळी समाज संस्थेचे विश्वस्त भगवान फुलसौंदर, संतोष म्हस्के,संजय गारुडकर,प्रा.माणिक विधाते,सचिव अमोल भांबरकर,खजिनदार विनोद पुंड,अनिल इवळे,डॉ.रणजीत सत्रे,उद्योजक राजेंद्र ताठे,विजयकुमार बोरुडे, कैलास गाडीलकर,समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे,माजी पंचायत समिती सभापती खंडु भुकन, किसनराव रासकर,विशाल गणेश देवस्थानचे विश्वस्त ज्ञानेश्वर रासकर, अंबादास गारुडकर,माळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष भूषण भुजबळ, नगरसेवक आशाताई डागवाले,सुजाता पडोळे, वंदनाताई ताठे,माजी नगरसेविका सुप्रियाताई जाधव,अनिता देवतकर, प्रयागताई लोंढे आदी मान्यवर उपस्थित होते.

आ.संग्राम जगताप म्हणाले, समाजाचा प्रत्येक माणूस समाजाला जोडला गेला पाहिजे,या उद्देशाने समाजाच्या अडचणी व समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी अहिल्यानगर सकल माळी समाज संस्थेचे अध्यक्ष किशोर डागवाले व बाळासाहेब भुजबळ संघटनेच्या माध्यमातून समाजाला दिशा देण्याचे काम करीत आहेत.या मेळाव्यातून अनेक विवाह जुळतील.हा मेळावा अहिल्यानगरच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरला जाईल.

उपमहापौर धनंजय जाधव म्हणाले,वधू-वर मेळाव्यातून समाजात एकोपा निर्माण होतो.समाजाने उत्कृष्ट पद्धतीने नियोजन केल्याने वधू-वर मेळावा यशस्वी झाला आहे.समाज हितासाठी वधू-वर मेळावा घेणे ही काळाची गरज आहे.यापुढील काळातही वधू-वर मेळावा घेण्यात येईल.

प्रास्ताविकात किशोर डागवाले म्हणाले,या वधू-वर मेळाव्याला जिल्ह्यासोबतच राज्यातून मोठा प्रतिसाद मिळाला आहे. गेल्या तीन वर्षांपासून अहिल्यानगर सकल माळी समाज संस्थेच्या वतीने वधू-वर नोंदणी कार्यालयाची सुरुवात करण्यात आली होती. सध्याच्या काळात लग्न जमविणे हा मोठा समाजाचा प्रश्न सोडविण्यासाठी अहिल्यानगर सकल माळी समाज संस्थेने प्रत्येक तालुक्यात संपर्क करून वधू-वर मेळावा यशस्वी करण्यासाठी जो प्रयत्न केला आहे तो यशस्वी झाला आहे. प्रथमच वधू-वर मेळाव्याला मोठा प्रतिसाद मिळाल्याने या मेळाव्यात जी लग्ने जमतील त्यांच्यासाठी सामुदायिक विवाह सोहळा आयोजित करण्यात येईल,अशी ग्वाही त्यांनी दिली.

कायनेटिक कंपनीने विविध क्षेत्रातील महिलांचा सन्मान करण्याचा उपक्रम कौतुकास्पद – महापौर

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– नगर शहराच्या आर्थिक जडणघडणीत कायनेटिक कंपनीने ५० वर्षाहून अधिक काळा महत्त्वाचा वाटा उचलला आहे. अशाही परिस्थितीत सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून कायनेटिक कारखान्याने विविध क्षेत्रातील महिलांचा सन्मान करण्याचा उपक्रम सुरू केला आहे ही बाब कौतुकास्पद आहे असे प्रतिपादन महापौर ज्योती गाडे यांनी केले.

कायनेटिक इंजिनियरिंग येथे गाडे यांच्या शुभहस्ते कंपनीच्या प्रांगणात प्रमिला हेरंब कुलकर्णी (एकल महिला विषयी कार्य) शिल्पा अजय धोपावकर (पत्रकारिता व समाज प्रबोधन) विद्या अविनाश तरटे (आरोग्य कार्यासाठी) वैशाली राजेश कुरापाटी(प्रशासकीय आस्थापना) व दिया राजेंद्र जासूद (क्रीडा क्षेत्रातील कार्यासाठी) या महिलांचा नारी सन्मान शक्तीचा या पुरस्काराने



गौरव करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नगर सेविका अश्विनी लोंढे व कमल कोतकर उपस्थित होत्या.

सौ ज्योती गाडे पुढे म्हणाल्या समाजाच्या जडणघडणीत महिलांचे मोलाचे योगदान असते. त्या आपल्या कर्तुत्वाने समाजाला नवी दिशा देत असतात. अशा कर्तुत्वान महिलांचा सन्मान करण्याचा कायनेटिक इंजिनियरिंग ने हा उपक्रम सुरू केला आहे. अशा प्रकारचा उपक्रम कंपनीने यापुढेही सुरू ठेवावा. कंपनीला या पुढे कोणतेही सहकार्य लागल्यास महापालिका त्यास नक्कीच मदत करेल असे सांगून कंपनीच्या नवीन प्रकल्पास शुभेच्छा दिल्या.

पुरस्कार प्राप्त प्रमिला कुलकर्णी म्हणाल्या, एकल महिलांचा प्रश्न कोरोना नंतर गंभीर बनला आहे. नगर जिल्ह्यात एक लाख १६ हजार एकल महिला आहेत. मी कार्य करीत असलेल्या अकोले तालुक्यात ११ हजार एकल महिला आहेत त्यांचे आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक प्रश्न जटिल आहेत. त्यापैकी बऱ्याचश्या महिलांकडे साधे आधार कार्ड, रेशन कार्ड ,बँक अकाउंट ही नाही. त्यासाठी मी व माझे पती हेरंब कुलकर्णी कार्यकर्त्यांच्या मदतीने प्रयत्न करीत आहोत. कायनेटिक कंपनीचा हा उपक्रम महिलांना प्रेरणादायी ठरेल. कंपनीचे संचालक शशिकांत गुळवे, यांनी प्रास्ताविक केले. संयोजक जयंत येलुलकर यांनी स्वागत केले. सरव्यवस्थापक एस एन जाधव यांनी आभार मानले. ऑपरेशन हेड हनीफ शेख,सरव्यवस्थापक के प्रदीप यांनी पाहुण्यांचा सत्कार केला सूत्रसंचालन डॉ. प्राजक्ता सावेडकर यांनी केले. यावेळी कामगार व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

एकनाथवाडीचे माजी सरपंच दिलीप खेडकर यांचे निधन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



खरवंडी कासार – पाथर्डी तालुक्यातील एकनाथवाडीचे माजी सरपंच दिलीपराव खेडकर यांचे नुकतेच निधन झाले आहे एकनाथवाडी येथील सामाजिक कार्यकर्ते, माजी सरपंच, वि.का. सेवा सोसायटीचे माजी चेअरमन आणि तंटामुक्ती अध्यक्ष कै. दिलीपराव रावसाहेब खेडकर यांचे रविवार, दिनांक ०१ नोव्हेंबर २०२६ रोजी पहाटे ४ वाजता दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या निधनाने एकनाथवाडी गावासह संपूर्ण पाथर्डी तालुक्यात मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे.

दिलीपराव खेडकर हे अत्यंत मनमिळावू, कार्यतत्पर आणि सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असणारे व्यक्तिमत्त्व होते. सरपंच आणि सोसायटीचे चेअरमन म्हणून त्यांनी गावात अनेक महत्त्वपूर्ण विकासकामे मार्गी लावली होती. त्यांच्या जाण्याने खेडकर कुटुंबावर आणि एकनाथवाडी ग्रामस्थांवर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले श्री. दादासाहेब दिलीपराव खेडकर व श्री. निळकंठ दिलीपराव खेडकर, मुलगी सौ. शोभा संदिप जवरे, सुना, नातवंडे असा मोठा आप्तपरिवार आहे. दशक्रिया विधी: - कै. दिलीपराव रावसाहेब खेडकर यांचा दशक्रिया विधी मंगळवार, दिनांक १० नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ९ वाजता एकनाथवाडी (ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर) येथे होणार आहे. यावेळी ह.भ.प. संतोष महाराज शास्त्री (निरंजन संस्थान, एकनाथवाडी) यांचे प्रवचन होईल, अशी माहिती खेडकर कुटुंबाकडून देण्यात आली आहे.

वीरशैव कक्कय्या समाजाच्या वधू-वर परिचय मेळाव्यास राज्यासह, कर्नाटक राज्यातून मोठा प्रतिसाद

समाजाच्या सभागृह जागेसाठी मदत करणार – आ.संग्राम जगताप



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– विवाहयोग्य युवक-युवतींना अनुरूप जीवनसाथी निवडण्यासाठी योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देण्याबरोबरच समाजातील एकोपा, संघटन आणि सामाजिक प्रगतीला चालना देण्याच्या उद्देशाने वीरशैव कक्कय्या (ढोर) समाज विकास मंडळाच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा शहरात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या मेळाव्याच्या निमित्ताने महाराष्ट्रासह कर्नाटक राज्यातील वीरशैव कक्कय्या समाजातील समाजबांधव आणि भगिनी मोठ्या संख्येने एकत्र आले. विवाह जुळविण्याच्या सामाजिक उपक्रमासोबतच समाजाची एकजूट आणि विकासाचा संकल्प करण्यात आला.

शहरातील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात मंडळाचे अध्यक्ष रमेश त्रिमुखे यांच्या अध्यक्षतेखाली या राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार संग्राम जगताप, आयएफएस (गुजरात) अधिकारी श्रीकांत केळगंद्रे, नगरसेविका रोशनी त्रंबके, पाथर्डी नगरपरिषदेचे नगरसेवक डॉ. जगदीश मुने, धनंजय कोकणे, हनुमंत सोनवणे, राधाकिसन त्रिंबके, वसंतराव केळगंद्रे, डॉ. पी. डी. सोनवणे, अशोक पाटेकर, बारामती नगरपरिषदेचे नगरसेवक सोमनाथ गजाकोष, परशुराम इंगोले आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले की, वधू-वर परिचय मेळाव्याच्या माध्यमातून समाजातील लोकांना एकत्र आणून समाजाची प्रगती साधण्याचे महत्त्वपूर्ण कार्य घडत असते. अनुरूप जीवनसाथी शोधण्याची प्रक्रिया अशा मेळाव्यामुळे अधिक सुलभ होते. त्यामुळे समाजाने अशा उपक्रमांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे. विवाह जुळविण्याबरोबरच समाजातील युवक-युवती, कुटुंबे आणि समाजबांधव यांच्यात परस्पर संवाद व सहकार्य वाढविण्यासाठी हे व्यासपीठ महत्त्वाचे ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले.

वीरशैव कक्कय्या समाजाच्या विविध सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमांसह शुभकार्यांसाठी अहिल्यानगर शहरात स्वतंत्र सभागृह उभारण्याच्या दृष्टीने पुरेशी जागा उपलब्ध करून देण्यासाठी आपण पाठपुरावा करू, अशी ग्वाही आमदार संग्राम जगताप यांनी दिली. मात्र, शासनाकडून जागा उपलब्ध झाल्यानंतर सभागृहाच्या बांधकामासाठी तसेच भविष्यातील देखभाल व व्यवस्थापनासाठी समाजानेही लोकसहभागातून आर्थिक योगदान द्यावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. समाजाच्या विकासासाठी शासनाच्या मदतीसोबतच समाजबांधवांचा सक्रिय सहभागही तितकाच महत्त्वाचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. याप्रसंगी वीरशैव कक्कय्या यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. या मेळाव्यास महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांसह कर्नाटक राज्यातूनही विवाहयोग्य युवक-युवती आणि त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आयएफएस अधिकारी श्रीकांत केळगंद्रे यांनी समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी समाजबांधवांनी एकमेकांना सहकार्य करावे आणि एकजुटीने प्रगतीच्या दिशेने वाटचाल करावी, असे आवाहन केले. समाजातील प्रत्येक घटकाने परस्परांना साथ दिल्यास सामाजिक आणि शैक्षणिक विकासाला अधिक गती मिळू शकते, असे त्यांनी सांगितले. रमेश त्रिमुखे म्हणाले की, समाजातील युवा पिढीने उच्च शिक्षण घेण्याबरोबरच व्यवसायाभिमुख होऊन स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा प्रयत्न करावा. शिक्षण, रोजगार आणि व्यवसायाच्या माध्यमातून आर्थिक स्वावलंबन साधणे ही काळाची गरज आहे. विवाहासाठी जीवनसाथी निवडताना केवळ रंग-वर्ण किंवा बाह्यरूपाला महत्त्व न देता व्यक्तिमत्त्वातील कला, गुण, स्वभाव आणि कर्तृत्वाला प्राधान्य द्यावे. तसेच वीरशैव कक्कय्या समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी राज्य सरकारने स्वतंत्र महामंडळाची स्थापना करावी. या मागणीसाठी संपूर्ण समाजाने एकत्र येऊन शासनदरबारी पाठपुरावा करण्याबरोबरच सरकारवर लोकशाही मार्गाने दबाव निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले. मेळाव्यामध्ये विवाहयोग्य युवक-युवतींचा परिचय करून देण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी निवृत्त तहसीलदार छाया चौधरी आणि ॲड. मनीषा केळगंद्रे यांनी पार पाडली. हा राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा यशस्वी करण्यासाठी भानुदास केळगंद्रे (बंडू मेजर), लालशेठ त्रंबके, डॉ. राहुल त्रिमूखे, शनिधर त्रंबके, राजेंद्र त्रंबके, विकास त्रिंबके, छाया त्रंबके, रेश्मा त्रंबके, प्रकाश सोनटक्के, राजेंद्र सोनटक्के उपाध्यक्ष बाबासाहेब त्रिंबके, सचिव प्रकाश कोकणे, गणेश नारायण, खजिंदार किशोर भालशंकर, एडव्होकेट मनीषा शिंदे, कार्यकारणी सदस्य अनिल त्रिमुखे, प्रशांत डहाके, राजू कोकणे, संजय कवडे, संजय खरटमळ, ओमप्रकाश कवडे, डॉ. विद्याधर त्रंबके, प्रवीण त्रंबके, सुरेंद्रकुमार बोराडे, शशिकांत डहाके, गणेश शिंदे, सुभाष बोराडे, विनोद इंगळे, संतोष सोनटक्के , सतीश केळगंड्रे, यांनी विशेष परिश्रम घेतले.

(पान १ वरून)

कारने येऊन घरफोड्या करणारी जालना जिल्ह्यातील टोळी गजाआड

तब्बल ३ लाख ९ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने लंपास केले होते. याप्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे तपास सुरू केला. हा गुन्हा जालना येथील कार्तिक प्रकाश आव्हाड आणि त्याच्या साथीदारांनी केल्याची खात्रीशीर माहिती पथकाला मिळाली. त्यानुसार पोलिसांनी तातडीने जालना गाठून कार्तिक आव्हाड (वय २०, रा. घनसावंगी, जि. जालना) याला ताब्यात घेतले. पोलिसी खाक्या दाखवताच त्याने आपले साथीदार गणेश आव्हाड, अभिषेक लोमटे आणि इतर साथीदारांसोबत डस्टर कार व पल्सर दुचाकीचा वापर करून हा गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी गणेश आव्हाड (रा. जालना) आणि अभिषेक लोमटे (रा. कळंब, जि. धाराशिव) यांनाही बेड्या ठोकल्या. त्यांचे साथीदार अर्जुन गायकवाड, पूजा आव्हाड आणि सुमित पांजगे (सर्व रा. घनसावंगी, जालना) हे फरार आहेत. पोलिसांनी अटक आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेली ८ लाखांची रेनॉल्ट डस्टर कार, एक लाखाची पल्सर दुचाकी आणि ८.४० लाखांचे ६० ग्रॅम सोने असा एकूण १७ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. अटक आरोपींना पारनेर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

नेवाशातील भुसार मालाचे दुकान फोडणारी आंतरजिल्हा टोळी जेरबंद

आधारे हा गुन्हा बुलढाणा जिल्ह्यातील भानुदास गायकवाड व त्याच्या साथीदारांनी केल्याची खात्रीशीर माहिती पथकाला मिळाली. त्यानुसार पोलिसांनी बुलढाणा आणि जालना जिल्ह्यांत कारवाई करत मुख्य सूत्रधारासह तिघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे सखोल चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली.
पोलिसांनी त्यांच्याकडून १८.८० क्विंटल सोयाबीन जप्त केले असून, आरोपींना पुढील तपासासाठी मुद्देमालासह नेवासा पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.
अटक केलेले आरोपी
या कारवाईत पोलिसांनी भानुदास बाबुराव गायकवाड (वय ३३, रा. देऊळगाव राजा, ता. देऊळगाव राजा, जि. बुलढाणा), विनोद विठ्ठल काळे (वय २८, रा. लोणगाव, ता. भोकरदन, जि. जालना) व अंकुश तेजराव खंदारे (वय ४०, रा. सातेफळ, ता. जाफराबाद, जि. जालना) यांना अटक केली आहे तर त्यांचे साथीदार आकाश शंकर मोरे (रा. देऊळगाव राजा, जि. बुलढाणा) व बळीराम रावसाहेब फुके (रा. उमरखेडा, ता. भोकरदण, जि. जालना) हे फरार आहेत.
यांच्या पथकाने केली कारवाई
ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. तपास पथकामध्ये पोलीस उपनिरीक्षक संदीप दरवडे, पोलीस अंमलदार बाळासाहेब नागरगोजे, फुरकान शेख, प्रशांत राठोड, अशोक लिपणे, किशोर शिरसाठ, विशाल तनपुरे, अजिनाथ पाखरे आणि शेवगाव उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयातील अंमलदार ज्ञानेश्वर शिंदे यांचा समावेश होता.

'ग्रीन सिटी' मोहिमेत १५ हजार वृक्षलागवड व संवर्धनाचे उद्दिष्ट पूर्ण!

नागरिकांनीही वृक्षांच्या संवर्धनासाठी सहभाग घेतला आहे. आगामी काळात पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर होण्याची शक्यता असल्याने त्यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे. ॲड. धनंजय जाधव या दिशेने प्रयत्न करत आहेत.वृक्षारोपणाशिवाय पर्यावरणाचा समतोल राखणे शक्य नाही. ऋतुमानाचा समतोल टिकविण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड आणि त्यांचे संवर्धन होणे आवश्यक आहे. यासाठी नागरिकांनीही पुढाकार घेऊन वृक्षारोपणाची लोकचळवळ उभी करावी, असे आवाहन वारे यांनी केले.
उपमहापौर ॲड. धनंजय जाधव म्हणाले की, पालकमंत्री ग्रीन सिटी मोहिमेअंतर्गत आतापर्यंत १५ हजार वृक्षलागवड व संवर्धनाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले आहे. सध्या पावसाचे आणि पाण्याचे प्रमाण कमी असल्यामुळे वृक्षलागवडीसमोर आव्हान निर्माण झाले आहे. त्यामुळे नागरिकांनी कमी पाण्यावर वाढू शकणाऱ्या वृक्षांची लागवड करण्यावर भर द्यावा. वृक्ष लावण्याबरोबरच त्यांचे नियमित संवर्धन करणेही तितकेच आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.
यावेळी आमदार योगेश टिळेकर यांच्या समवेत उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, नगरसेवक निखिल वारे, बाबासाहेब सानप, रोहन सानप, अभिजीत बोरुडे, ॲड. सुधीर पोटे, गणेश विद्ये, अमोल बागुल आदी उपस्थित होते.